[redacted]

(५)

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:- सगृयो-२०१३/१९८८/प्र.क्र.२५९/ १४स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक :- २४ ऑक्टोबर, २०१३.

प्रति,

मा.महानगरपालिका आयुक्त,
महानगर पालिका मुख्यालय, महापालिका मार्ग,
मुंबई — ४०० ००१.

विषय :- महानगरपालिकेच्या भाडेकरु मालमत्ताच्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थांचा पुनर्विकास करताना शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांच्या क्र.सगृयो २००७/प्र.क्र.५५४/ १४स, दिनांक ३.१.२००९ अन्वये दिलेले निर्देश.

संदर्भ :- आपले पत्र क्र.एमजीसी/जी/१०४९, दिनांक २६.८.२०१३.

महोदय,

(गृहनिर्माण)

C&R
29 OCT 2013

31/10

महानगरपालिकेने सन १९४० पूर्वी बांधलेल्या भाडेकरु /संपादित मालमत्तेचा, विद्यमान महानगरपालिका भाडेकरुनी स्थापन केलेल्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थांमार्फत पुनर्विकास करताना दिनांक ३.१.२००९ चे शासन निदेश व दिनांक १९.१०.२०११ च्या शुध्दीपत्रकान्वये पारित केलेल्या मार्गदर्शक सूचना महानगरपालिकेच्या वरील प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनुज्ञेय असणार नाहीत असे नमूद करुन यासंदर्भात पुढील मार्गदर्शन करण्याबाबत आपण संदर्भीय पत्रान्वये विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन मला आपणांस असे कळविण्याचे असे आदेश आहेत की, सन १९४० पूर्वी महानगर पालिकेने बांधलेल्या भाडेकरु/संपादित मालमत्तेचा पुनर्विकास करताना, भाडेकरुंच्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन त्यांच्यामार्फत पुर्नविकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्याकरीता महानगर पालिकेने तयार केलेली विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) मधील तरतुदी या पुष्कळशा शासनाच्या दिनांक ३.१.२००९ च्या शासन निदेशामधील तरतुदीशी सुसंगत आहेत. तथापि, भाडेकरुनी स्थापन केलेल्या प्रस्तावित गृहनिर्माण संस्था महानगरपालिकेच्या सुधार समितीच्या मान्यतेनंतर संबंधीत उप/सह निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी करण्यात येणार आहे. अशा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या भविष्यातील सर्व अडीअडचणी अथवा व्यवहार संबंधीत उप/सह निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयाशी निगडीत असणार आहेत. सबब सदर सर्व गृहनिर्माण संस्थांना या विभागाने निर्गमित केलेले गृहनिर्माण संस्थेशी संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके किंवा मार्गदर्शक तत्वे लागू पडतात सबब भाडेकरुंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना या विभागाने निर्गमित केलेले शासन निदेश दिनांक ३.१.२००९ ची मार्गदर्शक तत्वे व दिनांक १९.१०.२०११ शुध्दीपत्रकातील आदेश लागू होतील.

आपला,

(अ.शं भुजबळ)
कक्ष अधिकारी.

प्रत माहितीस्तव रवाना

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर पत्र सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयावे, ही विनंती.
२) उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
३) निवडनस्ती संग्रहार्थ.

\\MHSDC-FMS-FS०१\Redirect All Users Documents\nilam.ubale\My Documents\Misc\letter- २०१३.docx